| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**<br>**प्रेमलोक पार्क, चिंचवड** | |

## प्रेसनोट दि. ०८/०७/२०२३

**जनविकास समितीचे संस्थापक अध्यक्ष मयत किशोर गंगाराम आवारे याचे खुनाचे गुन्हयातील मास्टरमाईंड चंद्रभान विश्वनाथ खळदे यास गुंडा विरोधी पथकाने नाशिक येथुन घेतले ताब्यात.**

दि. १२/०५/२०२३ रोजी जनविकास समितीचे संस्थापक अध्यक्ष मयत किशोर गंगाराम आवारे यांचा तळेगाव दाभाडे नगर परीषदेच्या कार्यालयाचे आवारात शाम अरुण निगडीकर, प्रविण ऊर्फ रघुनाथ संभाजी धोत्रे, आदेश विठठल धोत्रे सर्व राहणार तळेगाव दाभाडे व संदीप ऊर्फ नन्या विठठल मोरे रा. आकुर्डी, पुणे यांनी गावठी पिस्तुलाने गोळीबार करुन कोयत्यांनी वार करुन खुन केला होता, सदर घटने बाबत तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक २३३/२०२३, भा.द.वि.क. ३०२,१२०(ब) भा.ह.का.कलम ३,४,२५ महा.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये गुन्हयाचा कट रचला म्हणुन गौरव चंद्रभान खळदे रा. तळेगाव दाभाडे, पुणे यास अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा मास्टर माईंड आरोपी नामे चंद्रभान विश्वनाथ खळदे, वय ६३ वर्षे, रा. कडोळकर कॉलनी, ऋतुचंद्र, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे याचे नाव निष्पन्न झाले होते, तेव्हापासुन भानु खळदे हा त्याचा वापरता मोबाईल बंद करुन तो रहात असलेल्या ठिकाणाहुन निघुन गेला होता. सुमारे ०२ महीने झाले तरीही भानू खळदे हा यापुर्वी सुमारे १५ वर्षे नगरसेवक असल्याने त्याचे बाबत कोणीही माहीती देत नसल्याने त्याचा थांगपत्ता लागत नव्हता.

गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी सपोनि माने व अंमलदार प्रविण तापकीर, सोपान ठोकळ व शुभम कदम यांनी पाहीजे आरोपी चंद्रभान विश्वनाथ खळदे याचे नातेवाईक, मित्र व ओळखीचे इसमांकडे तपास करीत होते, त्यांनी प्राप्त केलेल्या नातेवाईकांचे मोबाईल नंबरचे पोलीस अंमलदार गणेश मेदगे यांनी केलेल्या तांत्रीक विश्लेषणावरुन पाहिजे आरोपी हा प्रथम खंडाळा नंतर यवत ता. दौड नंतर हैदराबाद व नंतर नाशिक येथील सिंधी कॉलनी येथे वास्तव्यास असले बाबत माहीती मिळताच मा. वरिष्ठांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने व स्टाफ असे नाशिक येथे जावुन नाशिक शहर व परीसरात शोध घेवुन त्यास शिताफिने पकडुन पिंपरी चिंचवड येथे आणुन तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे, सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हे करीत आहेत.

आरोपी चंद्रभान विश्वनाथ खळदे याचेवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | **तळेगाव दाभाडे** | **/१९९२, भादवि कलम ३०२** |
| २ | **तळेगाव दाभाडे** | **१८८/२००६,भादवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६** |
| ३ | **तळेगाव दाभाडे** | २३३/२०२३,भा.द.वि.क.३०२,१२०(ब)भा.ह.का.क.३,४,२५महा.पो.का.क.३७(१)(३)सह १३५ |

सदरची कारवाई ही मा. श्री. विनयकुमार चौबे सो., पोलीस आयुक्त, मा. डॉ. श्री. संजय शिंदे सो. सह पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी सो. अपर पोलीस आयुक्त, स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सतिश माने, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे एच.व्ही.माने सहायक पोलीस निरीक्षक पोलीस अंमलदार- हजरत पठाण, प्रविण तापकिर, सोपान ठोकळ, गंगाराम चव्हाण, विक्रम जगदाळे, गणेश मेदगे, विजय गंभिरे, सुनिल चौधरी, नितीन गेंगजे, शाम बाबा, विजय तेलेवार, मयुर दळवी, रामदास मोहीते, ज्ञानेश्वर गिरी, शुभम कदम, तौसीफ शेख तसेच तांत्रीक विश्लेषण विभागाचे नागेश माळी व पोपट हुलगे यांनी केली आहे.

**( स्वप्ना गोरे )**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय